दिनांक ३० डिसेंबर २०१८

**कृपया प्रसिद्धीसाठी**

**19 व्या पार्ले महोत्सव : सी. एम. चषकाच्या लघुपट स्पर्धेत `देवा तुला शोधू कुठे' ने मारली बाजी**

गेल्या सात दिवसांपासून विलेपार्ले येथे सुरू असलेल्या 19 व्या पार्ले महोत्सव ः सी. एम. चषकात लघुपट चित्रपटांच्या स्पर्धेत अक्षय वासकर यांच्या देवा तुला शोधू कुठे ने बाजी मारली तर दुस-या व तिस-या क्रमांकावर अनुक्रमे अनिकेत कदम यांच्या वेक अप तर मनिष मेहेर यांच्या नाझारिया लघुपटांनी पारितोषिक पटकावले. ड्रीम ऑफ कोव्हेटस् या नरेंद्र कदम यांच्या आणि तिलोत्तम पवार यांच्या पाय इन दी स्काय या लघुपटांनी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. सचिन शिगवण यांच्या दी सोलार मॅन या लघुपटाला विशेष पारितोषिक दिले गेले. राहूल खंदारे, सेजल पेंटर, सीमा देसाई, दीपक देसाई, समीर नाडकर्णी, जयदीप बर्वे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. महोत्सवाचे मुख्य आयोजक भाजपा आमदार ॲड पराग अळवणी व नगरसेविका ज्योती अळवणी यांच्या विजेत्यांचे अभिनंदन केले.

पार्ले महोत्सव हा जनतेच्या स्वतःचा उत्सव असून त्यांचा सक्रीय सहभाग त्याची चाहूल लागण्यापासूनच होत असतो, त्यांच्या सहभागाने हा महोत्सव तसेच सी. एम. चषक स्पर्धा देखील यशस्वी होत असून ही एक चळवळ आहे आणि भविष्यातून समाजासाठी एक उत्तम कलाकार तसेच खेळाडू निश्चितपणे महाराष्ट्राला आणि देशाला लौकिक प्राप्त करून देतील, असे विचार मुख्य आयोजक भाजपा आमदार ॲड. पराग अळवणी यांनी व्यक्त केले आहे.

आरोग्यविषय जागरुकता वाढीस लागावी, यासाठी आयोजित करण्यात आलेल्या योगस्पर्धेत देखील स्पर्धकांचा लक्षणीय सहभाग होता. त्याचे पहिल्या तीन क्रमाकांचे निकाल पुढीलप्रमाणे : 8 वर्षांखालील मुलींचा गट : भारवी पाटील, काशवी शहा, आर्या साप्ते, 8 ते 11 वयोगट - स्वाराली तांबे, स्वरा गुजर, आदिती सावंत, 11 ते 14 वयोगट - तन्वी रेडीज, रिद्धी बचिम, आर्या तांबे, 14 ते 17 वयोगट - दुर्वा परवब, दुर्गा दाभोळकर, खुशी तिवारी, 17 ते 25 वयोगट - मानसी ताडे, जान्हवी आल्हाल, श्रृती फाळके, 25 ते 40 वयोगट - रमझा, नीलम जाधव, सरीता घोरपडे, 40 ते 55 वयोगट - शशिकला परमार, रुपाली वाईकर, अक्षया धुर्ज, 55 वर्षांवरील महिलागट - अलका जाधव, राधिका केतकर, संगीता नास्ता, मुलगे - 8 वर्षांखालील - भावेश पाटील, स्वरुप घाडी, समर्थ मालप, 8 ते 11 वयोगट - दुर्वांकुर देवगळ, पार्थ

कदम, कौशिक गावडे, 11 ते 14 वयोगट - उत्कर्ष पितांबर, ओम राजभर, मानव घाडी, 14 ते 17 वयोगट - वैभव कोरडे, शिशिर कुरुप, अंशुल कुरुप, 17 ते 25 वयोगट - सागर शितकर, संकेत लिंगराज, रोहन चव्हाण, 25 ते 40 वयोगट - विवेक पाटील, श्रीकांत शेलार, रोहित पिल्ले, 40 ते 55 वयोगट - दिलीप चव्हाण, दीपक नारकर, मिलिंद नारखेडे, 55 वर्षांवरील वयोगट - हिमांशु मेहता, जयंत भूमकर.